# University Of Mumbai

**Press Note**

**Date- April 3, 2014**

# University Of Mumbai received 10.85 Cr Grants from UGC for Excellence

Mumbai-The University of Mumbai has received a grant of Rs 10.85 cr from the University Grants Commission (UGC) under the University with Potential for Excellence (UPE) scheme. This is part of Rs 30 cr fund that the University of Mumbai has been sanctioned for the scheme. Of this the university has already received Rs 10 cr and the Rs 10.85 cr is the second installment. The remaining amount will be released after UGC assesses the progress of the scheme by the university.

Under this scheme the University of Mumbai has undertaken various research programs with a major thrust on Green Technology which has been allocated the maximum amount of Rs 12 cr. The Jawaharlal Nehru Centre for Society, Science and Technology has been allocated Rs 5.45 cr while Rs 4.45 cr and Rs 3.7 cr has been sanctioned for Guest house and upgradation of library and laboratory facilities, Information and Communication infrastructure and e-governance respectively. Funds have also been allocated for Dr Babasaheb Ambedkar Center for Social Justice, group research on Indian Diaspora, center for multi-disciplinary research in language and literature and for international students.

Under this scheme, state universities are provided funds to undertake large research projects that they cannot afford to pursue due to lack of funds. The basic aim of the scheme is not only to support few research projects but to stimulate innovative approaches in teaching, research and governance leading to excellence.

| Sr.no | Items | Grants Approved (Rs.in Lakh) |
|---|---|---|
| 1 | A) Center for Green Technology<br>B) additional allocation for building | 1100.00<br>100.00 |
| 2 | Center For Digital Preservation of Palm-Lead Manuscript | 30.00 |
| 3 | Center For Multi-Disciplinary Research in Language and Literature | 50.00 |
| 4 | Group Of Research on Indian Diaspora | 40.00 |
| 5 | Dr. Babasaheb Ambedkar Center for Social Justice | 60.00 |
| 6 | Center For Computational Social Sciences | 135.00 |
| 7 | Jawaharlal Nehru Center for Society, Science and Technology | 125.00 |
| 8 | International Students | 545.00 |
| 9 | Guest House | 445.00 |
| 10 | Upgradation Of Library, Laboratory Facilities, information and Communication Infrastructure and E-governance | 370.00 |
| | Total - | 3000.00 (30 Crore) |

Leeladhar Bansod,

Deputy Registrar (PR)

# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक-३ एप्रिल २०१४

## मुंबई विद्यापीठाला युजीसीकडून १०.८५ कोटींचे अनुदान

मुंबई-मुंबई विद्यापीठाला  विद्यापीठ अनुदान आयोगाच्या युपीई (युनिव्हर्सिटी विथ पोटेंशियल फॉर एक्सलेंस) योजनेअंतर्गत १०.८५ कोटींचे अनुदान मिळाले आहे.विद्यापीठ अनुदान आयोगाच्या युपीई या योजनेअंतर्गत मुंबई विद्यापीठाला एकुण ३० कोटींचे अनुदान मान्य करण्यात आले होते.त्यापैकी १० कोटी रुपये याआधी विद्यापीठाला मिळाले असुन उर्वरित रक्कमेपैकी १०.८५ कोटी इतकी रक्कमेचे अनुदान आता देण्यात आले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या युपीई योजनेअंतर्गत मुंबई विद्यापीठाला विविध १० बाबींकरीता अनुदान मंजूर करण्यात आले आहे.ज्यामध्ये सेंटर फॉर ग्रीन टेक्नॉलॉजी १२ कोटी ( इमारतीकरिता १ कोटी),सेंटर फॉर डीजीटल प्रीझर्व्हेशन ऑफ पाम -लीड मॅन्युस्क्रिप्ट ३० लाख,सेंटर फॉर मल्टी डिसीप्लनरी रिसर्च इन लँग्वेज अँड लिटरेचर ५० लाख,ग्रुप ऑफ रिसर्च ऑन इंडियन डायस्पोरा ४० लाख,डॉ.बाबासाहेब आंबेडकर सेंटर फॉर सोशल जस्टीस ६० लाख,सेंटर फॉर कम्प्युटेशनल सोशल सायन्स १३५ लाख,जवाहरलाल नेहरु सेंटर फॉर सोसायटी, सायन्स अँड टेक्नॉलॉजी १२५ लाख,इंटरनेशनल स्टूडेंट्स ५४५ लाख,गेस्ट हाऊस ४४५ लाख,अपग्रेडेशन ऑफ लायब्ररी,लॅबोरेटरी फॅसिलीटीज,इन्फॉरमेशन अँड कम्युनिकेशन इन्फ्रास्ट्रक्चर अँड इ-गव्हर्नंस ३७० लाख असे एकुण ३० कोटींचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या युपीई योजनेअंतर्गत मुंबई विद्यापीठाने ग्रीन टेक्नॉलॉजी याकडे लक्ष केंद्रीत केले होते.तर उर्वरित रक्कम ही विद्यापीठाच्या विविध १२ विभागांच्या सकल विकासासाठी मंजूर करण्यात आली होती. युपीईच्या पथकाने मुंबई विद्यापीठाला १३ आणि १५ फेब्रुवारी २०१४ ला भेट दिली होती.त्यामध्ये विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यात आला होता,आणि कमीटीने केलेल्या शिफारशीनुसार उर्वरित रक्कम ही लवकरच देण्यात येणार असल्याचे जाहिर केले होते.मुंबई विद्यापीठाने या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यापीठाचा प्रगती अहवाल तयार केला होता त्यामध्ये विद्यापीठाची शैक्षणिक प्रगती,विविध विषयातील संशोधन,शिक्षणाची गुणवत्ता तसेच भविष्यकालीन योजनांचा समावेश करण्यात आला आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने शैक्षणिक व प्रशासकीय सुधारणांवर भर दिला आहे.राज्यातील अनेक विद्यापीठांना मिळणा-या अपु-या अनुदामुळे विद्यापीठांचा सर्वतोपरी विकास साधला जाऊ शकत नसल्याने विद्यापीठ अनुदान आयोग पुढे सरसावले आहे.विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दहाव्या पंचवार्षिक योजने अंतर्गत ४ विद्यापीठांपैकी मुंबई विद्यापीठाची निवड करण्यात आली होती.विद्यापीठांच्या शैक्षणिक व प्रशासकीय सुधारणावर भर देत तसेच विद्यापीठात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाला चालना मिळावी,स्पर्धेच्या युगात टिकता यावे,शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी,भविष्यकालीन आव्हानांना पेलण्याचे सामर्थ्य निर्माण करण्यासाठी तसेच उत्कृष्ट दर्जाच्या साहित्य निर्मितीसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या युपीई योजनेअंतर्गत मुंबई विद्यापीठाला ३० कोटीचे अनुदान मंजुर करण्यात आले आहे.

| क्रमांक | विषय | अनुदान (लाखांत) |
|---|---|---|
| १ | सेंटर फॉर ग्रीन टेक्नॉलॉजी<br>( इमारतीकरिता १ कोटी), | ११००.००<br>१००.०० |
| २ | सेंटर फॉर डीजीटल प्रीझर्व्हेशन ऑफ पाम -लीड मॅन्युस्क्रिप्ट | ३०.०० |
| ३ | सेंटर फॉर मल्टी डिसीप्लनरी रिसर्च इन लँग्वेज अँड लिटरेचर | ५०.०० |
| ४ | ग्रुप ऑफ रिसर्च ऑन इंडियन डायस्पोरा | ४०.०० |
| ५ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर सेंटर फॉर सोशल जस्टीस | ६०.०० |
| ६ | सेंटर फॉर कम्प्युटेशनल सोशल सायन्स | १३५.०० |
| ७ | जवाहरलाल नेहरु सेंटर फॉर सोसायटी, सायन्स अँड टेक्नॉलॉजी | १२५.०० |
| ८ | इंटरनेशनल स्टूडेंट्स | ५४५.०० |
| ९ | गेस्ट हाऊस | ४४५.०० |
| १० | अपग्रेडेशन ऑफ लायब्ररी,लॅबोरेटरी फॅसिलीटीज,इन्फॉरमेशन अँड कम्युनिकेशन इन्फ्रास्ट्रक्चर अँड इ-गव्हर्नंस | ३७०.०० |
| | एकुण- | ३०००.०० लाख (३० कोटी) |

लीलाधर बन्सोड

उपकुलसचिव (जनसंपर्क)